पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – ८२**

(सभावृत्तांत)

**दिनांक – २५/०९/२०१८** **वेळ – दुपारी २.०० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक २५/०९/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.ममता विनायक गायकवाड - सभापती
२. मा.राजू मिसाळ
३. मा.अमित राजेंद्र गावडे
४. मा.गावडे राजेंद्र तानाजी
५. मा.आंगोळकर सागर सुनिल
६. मा.करुणा शेखर चिंचवडे
७. मा.मडिगेरी विलास हनुमंतराव
८. मा.गीता सुशिल मंचरकर
९. मा.खानोलकर प्रज्ञा महेश
१०. मा.लांडगे सारिका संतोष
११. मा.बोईनवाड यशोदा प्रकाश
१२. मा.डोळस विकास हरिश्चंद्र
१३. मा.बारणे अर्चना तानाजी
१४. मा.साधना अंकुश मळेकर

याशिवाय मा.आष्टीकर – प्र.अतिरिक्त आयुक्त(१), मा.गावडे – प्र.अतिरिक्त आयुक्त(२) मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कुंभोजकर – मुख्य लेखापरिक्षक, मा.चव्हाण - शहर अभियंता, मा.डॉ.रॉय - आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकूर - उपसंचालक नगररचना, मा.कोळंबे – मुख्य लेखापाल, मा.पठाण – सह शहर अभियंता, मा.चितळे, मा.खोराटे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.झगडे - सहाय्यक आयुक्त, मा.लोणकर, मा.बोदडे, मा.राऊत, मा.दांगट मा.खोत, – प्र. सहाय्यक आयुक्त, मा.साळुंके – मुख्य उद्यान अधिक्षक, मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण विभाग) मा.पाटील – प्राचार्य औ.प्र.केंद्र, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.निकम, मा.सवणे, मा.तांबे, मा.चव्हाण, मा.कुलकर्णी, मा.खाबडे,

मा.जुंधारे, मा.गलबले, मा.घोडे, मा.कांबळे, मा.ओंभासे, मा.गट्टुवार, मा.पुजारी, मा.मोरे, मा.पाटील, मा.घुबे, मा.सुपेकर, मा.देशमुख, मा.धानोरकर- कार्यकारी अभियंता, मा.डॉ.दगडे – पशुवैद्यकिय अधिकारी, मा.माने – लेखाधिकारी, पीएमपीएमएल हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –**

विषय क्र.४५) निगडी येथील से.क्र.२२ येथील विद्युत दाहीनीची वार्षिक पध्दतीने चालन व देखभाल करणेबाबत.

विषय क्र.४६) निविदा क्र.५/१/२०१८-१९ चे कामाचा करारनामा करणेस मंजूरी मिळणेबाबत.

विषय क्र.४७) निविदा क्र.५/२/२०१८-१९ चे कामाचा करारनामा करणेस मंजूरी मिळणेबाबत.

विषय क्र.४८) निविदा क्र.५/३/२०१८-१९ चे कामाचा करारनामा करणेस मंजूरी मिळणेबाबत.

विषय क्र.४९) निविदा क्र.५/४/२०१८-१९ चे कामाचा करारनामा करणेस मंजूरी मिळणेबाबत.

----------

(मा.पठाण, सह शहर अभियंता यांची महापालिका सेवेतून नियतवयोमान सेवानिवृत्तीमुळे आणि श्री.हर्षद कुलकर्णी (प्रशिक्षक), कु.प्रणित आढाव व कु.रूजुला देव घरे यांचा ऐरोबीक जिम्नॅस्टिक या स्पर्धात कांस्य पदक मिळविलेबद्दल मा.सभापती, स्थायी समिती यांचे हस्ते सत्कार करण्यात आला)

----------

दिनांक १८/०९/२०१८ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ८१)** चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक -३१९४ विषय क्रमांक - ०१

दिनांक – २५/०९/२०१८ विभाग – विद्युत मुख्यालय

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा. अति.आयुक्त(१) यांचे जावक क्र.विमुका/५/कावि/३०८/२०१८ दि.२८/०८/२०१८

विषय – मनपाच्या भोसरी येथील अंकुशराव लांडगे प्रेक्षागृह इमारतीमधील अग्नीशमन यंत्रणेसाठी नविन रिंग मॅन पाईपलाईन टाकणे व अनुषंगिक कामे करणेबाबत.

विषय क्रमांक ०१ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३१९५ विषय क्रमांक - ०२

दिनांक – २५/०९/२०१८ विभाग – लेखा

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/६/कावि/१०१४३/२०१८ दि.०३/०९/२०१८

विषय - "फ क्षेत्रिय" कार्यालय स्थापत्य या विभागाकडील सन२०१८-१९ च्या अंदाजपत्रकामधील कामांच्या अंतर्गत तरतुदीमध्ये वाढ घट करणेबाबत.

विषय क्रमांक ०२ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३१९६ विषय क्रमांक - ०३

दिनांक – २५/०९/२०१८ विभाग – मध्यवर्ती भांडार

सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.साधना मळेकर

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/०५/कावि/६०९/२०१८ दि.१०/०९/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड मनपाचे विविध विभागांकडील कॅनन मेक कंपनीचे प्रिंटरसाठी आवश्यक Genuine Toner/Cartridge खरेदीकामी केंद्र शासनाकडील Gem, government, e-market plus वर ऑनलाईन Bid Number-GEM/2018/B/52515 अन्वये दर मागविणेत आले होते. त्यानुसार एकूण चार बिडरकडून ऑनलाईन दर प्राप्त झालेले आहेत. प्राप्त दरपत्रकामध्ये मे.मोनार्च टेक्नॉलॉजीस (पुणे) प्रा.लि. पुणे-४११००४ यांचे Genuine Toner/Cartridge (Toner No- Canon 337) (कॅनन मेक) बाब क्र.१ एकूण-५०० नग साहित्यासाठी र.रु.२१,८७,०००/- लघुत्तम दर प्राप्त झाले आहेत. सदरचा खर्च हा अंदाजपत्रकीय रक्कमे पेक्षा २०.८७% ने कमी आहे. प्रस्तूतकामी केलेल्या संविदेची माहिती अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक -३१९७ विषय क्रमांक - ०४
दिनांक – २५/०९/२०१८ विभाग – जलनि:सारण
सूचक – मा.यशोदा बोईनवाड अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.जनि/०२/कावि/१६१३/२०१८ दि.१२/०९/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या जलनि:सारण विभागाकडील नि.नो.30/2/2017-18 अन्वये काळेवाडी, रहाटणी भागातील पवना नदीच्या कडेने मुख्य गुरुत्व वाहिनीची सुधारणा विषयक कामे करणेकामी M/S.SANKALP INFRASTRUCTURE यांनी नि.र.रू.६०,००,०००/- (अक्षरी र.रू.साठ लाख रुपये फक्त) पेक्षा २८.७०% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजूर दराने र.रू.४२,७८,०००/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३१९८ विषय क्रमांक - ०५
दिनांक – २५/०९/२०१८ विभाग – पाणीपुरवठा
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/मुख्य/२९२/२०१८ दि.११/०९/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड शहरातील पाणीपट्टीचे दर बदल व अनाधिकृत नळजोड नियमित करणेच्या दृष्टीकोनातून मा.महापालिका सभा ठराव क्र.१४७ दि.२८/०२/२०१८ व मा.महापालिका सभा ठराव क्र.१८७, दि.२०/०४/२०१८ च्या अनुषंगाने आदेश क्र.जशुके/पापु/१९३/२०१८, दि.०७/०६/२०१८ अन्वये मा.आयुक्त यांनी आदेश निर्गमित केले आहेत. झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प व झोपडपट्ट्या यामधील नळजोडांचे दर वास्तववादी असावेत तसेच झोपडपट्ट्यांमधील अनाधिकृत नळजोड नियमित करणेकामी अनामत रक्कम, दंड व पाणीपट्टी (मागील वर्षांची) याबाबत निर्णय घेणेसाठीच्या सोबतचे परिशिष्ट अ प्रमाणेच्या प्रस्तावास मान्यता घेणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिकासभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३१९९ विषय क्रमांक - ०६
दिनांक – २५/०९/२०१८ विभाग – जलनि:सारण
सूचक – मा.सारिका लांडगे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.जनि/२/कावि/१६१४/२०१८ दि.१२/०९/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या जलनि:सारण विभागाकडील नि.नो.क्र.७/६/२०१७-१८ अन्वये नवी सांगवी मुख्य जलनिःसारण नलिकामध्ये सुधारणा करणेकामी M/s.S.K.Bhosale Contractor यांनी नि.र.रू.५९,९९,९३५/- (अक्षरी र.रू.एकोणसाठ लाख नव्याण्णव हजार नऊशे पस्तीस फक्त) पेक्षा १७.१०% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजूर दराने र.रू.४९,७३,९४६/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करूनघेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३२०० विषय क्रमांक - ०७
दिनांक – २५/०९/२०१८ विभाग – मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ – मा.सहा आयुक्त (भांडार) यांचे जावक क्र.मभां/८/कावि/११८४/२०१८ दि.१२/०९/२०१८

मा.सहा आयुक्त (भांडार) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाचे विविध विभागासाठी आवश्यक छपाई साहित्य मनपा नमुन्याप्रमाणे छपाई करुन पुरवठा करणेकामी ई.नि.सु.क्र.५५/२०१७-१८ अन्वये लघुत्तम कोटेशनधारक १) मे.जय गणेश ऑफसेट पुणे यांचे बाब क्रं.१ व ६ असे एकुण २ बाबी करिता ३४,६५०/- २)मे.डी.एन.एम.प्रिंटींग हाऊस पुणे यांचे बाब क्रं.०७ असे एकुण ०१ बाबी करिता ४२,०००/- ३) मे.आशिष एंटरप्रायजेस,चिंचवड यांचे बाब क्रं २,३,४,५,८,९ व १० असे एकुण ०७ बाबी करिता २,२६,०१५/- असे एकुण १० बाबी छपाईकामी एकुण र.रु.३,०२,६६५/- (अक्षरी र.रु.तीन लाख दोन हजार सहाशे पासष्ठ फक्त) इतके दर लघुत्तम प्राप्त असुन सदरचे दर स्विकृत करणेत आले आहेत. त्यानुसार तिनही निविदाधारकानां विविध विभागासाठी आवश्यक छपाई साहित्य पुरविणेकामी पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेला आहे. सदर झालेल्या खर्च एकुण र.रु एकुण र.रु.३,०२,६६५/- (अक्षरी र.रु.तीन लाख दोन हजार सहाशे पासष्ठ फक्त) चे खर्चाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक -३२०१ विषय क्रमांक - ०८
दिनांक – २५/०९/२०१८ विभाग – क क्षेत्रीय, स्थापत्य
सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.साधना मळेकर
संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे जावक क्र.कक्षेका/स्था/प्र.क्र.२/६९/२०१८ दि.१५/०९/२०१८

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

प्रभाग क्र.२ चिखली स्मशानभुमी RCC मध्ये करणे व बैठक व्यवस्था स्टेडीयम पध्दतीने करणेकामी प्रस्तावात नमूद प्रमाणे मे.सचिन आपटे आणि असोसिएट्स यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करणेस व निविदापुर्व ०.५०% (Pre tender activity) व निविदा पश्र्चात १.२५% (post tender activity) कामांसाठी प्रकल्प खर्चाच्या १.७५% फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३२०२ विषय क्रमांक - ०९
दिनांक – २५/०९/२०१८ विभाग – क क्षेत्रीय, स्थापत्य
सूचक – मा.करूणा चिंचवडे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे जावक क्र.कक्षेका/स्था/प्र.क्र.२/७०/२०१८ दि.१५/०९/२०१८

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

प्रभाग क्र.२ मधील साई जीवन शाळे शेजारील मैदान विकसीत करणेकामी प्रस्तावात नमूद प्रमाणे मे.ज्योती पानसे असोशिएट्स यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करणेस व निविदापुर्व ०.५०% (Pre tender activity) व निविदा पश्र्चात १.३५% (post tender activity) कामांसाठी प्रकल्प खर्चाच्या १.८५% फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३२०३ विषय क्रमांक - १०
दिनांक – २५/०९/२०१८ विभाग – क क्षेत्रीय, स्थापत्य
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे जावक क्र.कक्षेका/स्था/प्र.क्र.२/६८/२०१८ दि.१५/०९/२०१८

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

प्रभाग क्र.२ जाधववाडी मधील गट नं.५३९ विकसीत करणेकामी प्रस्तावात नमूद प्रमाणे मे.ज्योती पानसे असोशिएट्स यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करणेस व

निविदापुर्व ०.५०%(Pre tender activity) व निविदा पश्र्चात १.३५%(post tender activity) कामांसाठी प्रकल्प खर्चाच्या १.८५ % फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३२०४ विषय क्रमांक - ११

दिनांक – २५/०९/२०१८ विभाग – ड क्षेत्रीय, स्थापत्य

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे जावक क्र.डक्षेका/स्था/कावि/१२०७/२०१८ दि.१०/०९/२०१८

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

प्र.क्रं.२६ पिंपळे निलख स्मशानभूमी विकसीत करणे व स्थापत्य विषयक अनुषंगिक कामे करणेकामी प्रस्तावात नमूद प्रमाणे मे.सचिन आपटे आणि असोसिएट्स यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करणेस व निविदा पुर्व (Pre tender) व निविदा पश्चात (post tender) कामांसाठी प्रकल्प खर्चाच्या २% फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३२०५ विषय क्रमांक - १२

दिनांक – २५/०९/२०१८ विभाग – ड क्षेत्रीय, स्थापत्य

सूचक – मा.यशोदा बोईनवाड अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे जावक क्र.डक्षेका/स्था/कावि/१२०६/२०१८ दि.१०/०९/२०१८

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

प्र.क्रं.२६ कस्पटेवस्ती स्मशानभूमी विकसीत करणे व स्थापत्य विषयक अनुषंगिक कामे करणेकामी प्रस्तावात नमूद प्रमाणे मे.सचिन आपटे आणि असोसिएट्स यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करणेस तसेच निविदा पुर्व (Pre tender) व निविदा पश्चात (post tender) कामांसाठी प्रकल्प खर्चाच्या २% फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३२०६ विषय क्रमांक - १३

दिनांक – २५/०९/२०१८ विभाग – उद्यान

सूचक – मा.करूणा चिंचवडे अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/६/कावि/९४३/२०१८ दि.१५/०९/२०१८

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाचे उदयान विभागाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ (१ ते ६) मधील निविदा कामांचे अवलोकन होवुन नियमानुसार व निविदा अटी/शर्ती प्रमाणे तसेच भाववाढ कलम लागु असल्यास भाववाढ कलमानुसार देखभाल व संरक्षण कामासाठी निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन संबंधित ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन आदेश निर्गत केलेले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३२०७ विषय क्रमांक - १४

दिनांक – २५/०९/२०१८ विभाग – ब क्षेत्रीय कार्यालय

सूचक – मा.यशोदा बोईनवाड अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.बक्षे/लेखा/९/कावि/२५८/२०१८ दि.१४/०९/२०१८

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या ब क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.1/13-2018-2019 अन्वये सन २०१८-१९ करिता प्रभाग क्र.२२ मध्ये सारथी हेल्पलाईनची तक्रारी निवारण करणेची कामे करणेसाठी नि.र.रु.8,36,901/- (अक्षरी र.रू.आठ लाख छत्तीस हजार नउशे एक फक्त) पेक्षा -28.09% कमी मे.वैष्णवी एंटरप्रायजेस या ठेकेदारांकडून काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी शर्तीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आलेला असलेने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३२०८ विषय क्रमांक - १५

दिनांक – २५/०९/२०१८ विभाग – वाय.सी.एम.एच.

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.सहा.आयुक्त(भांडार) यांचे जावक क्र.YCMH/भांडार/२/कावि/३९२/२०१८ दि.१८/०९/२०१८

मा.सहा.आयुक्त(भांडार) यांनी शिफारस केले प्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या डायलिसिस विभागातील गॅंब्रो कंपनीचे डायलिसीस मशीन सिरीयल क्र.६९९९ व ७५८९ चे AMC करणेकामी संबंधित कंपनी Baxter India Pvt.Ltd, Chennai यांनी एकूण र.रु.८२,०९८/- चे दरपत्रक सादर करण्यात आलेले असुन सदरचे दरपत्रक स्विकृत करण्यात आले आहे. त्यानुसार डायलिसीस विभागातील गॅम्ब्रो कंपनीच्या डायलिसीस मशीन सिरियल नं.६९९९ व ७५८९ चे AMC, Baxter India Pvt.Ltd यांचेकडून त्यांनी सादर

केलेले दरपत्रक एकूण र.रु.८२,०९८/- नुसार निविदा न मागवता, करारनामा करुन मनपा अधिनियम अनुसुची ड प्रकरण ५ (२)(२) नुसार थेट पध्दतीने करण्यास व सदर AMC साठी होणारा खर्च एकूण र.रु.८२,०९८/- (अक्षरी र.रु.ब्याऐंशी हजार अठ्ठ्याण्णव फक्त) ला मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३२०९ विषय क्रमांक - १६

दिनांक – २५/०९/२०१८ विभाग – वाय.सी.एम.एच.

सूचक – मा.करूणा चिंचवडे अनुमोदक – मा.साधना मळेकर

संदर्भ – मा.सहा.आयुक्त(भांडार) यांचे जावक क्र.YCMH/भांडार/२/कावि/३९३/२०१८ दि.१८/०९/२०१८

मा.सहा.आयुक्त(भांडार) यांनी शिफारस केले प्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या डायलिसिस विभागातील फ्रेसिनस कंपनीच्या डायलिसीस मशीन Sr.No.4V5AYG83, 5V5AZQ63 व 5V5AZQ64 चे AMC करणेकामी संबंधित उत्पादित कंपनी मे.फ्रेसिनस मेडीकल केअर इंडिया प्रा.लि., मुंबई यांनी सादर केलेले एकूण र.रु.६५,५७८/- चे दरपत्रक स्विकृत करणेत आले आहे. त्यानुसार डायलिसीस विभागातील डायलिसीस मशीन Sr.No.4V5AYG83, 5V5AZQ63व 5V5AZQ64चे AMC संबंधित उत्पादित कंपनी मे.फ्रेसिनस यांचेकडून त्यांनी सादर केलेले दरपत्रक एकूण र.रु.६५,५७८/-(सर्व करांसहित) नुसार निविदा न मागवता, करारनामा करुन मनपा अधिनियम अनुसुची ड प्रकरण ५(२)(२)नुसार थेट पध्दतीने करण्यास व सदर AMC साठी होणारा खर्च र.रु.६५,५७८/-(सर्व करांसहित) मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३२१० विषय क्रमांक - १७

दिनांक – २५/०९/२०१८ विभाग – औ.प्र.सं., मोरवाडी

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.अर्चना बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.औप्रसं/४/कावि/१७५/२०१८ दि.१५/०९/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

औद्योगिक प्रशिक्षण संस्था मोरवाडी येथे प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण देणेकरिता मा.अति. आयुक्तसो. यांचेकडील आदेश क्रमांक औप्रसं/४/कावि/१२६६/२०१७ दि.१९/१२/२०१७ अन्वये खालील कर्मचा-यांना दिनांक ०२/१२/२०१७ ते ०१/०६/२०१८ या सहा महिने कालावधीसाठी एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात एकत्रित र.रू.२५,०००/- (अक्षरी र.रू.पंचवीस हजार फक्त.) नेमणूक देण्यात आलेली आहे. सदर नेमणूकीचा कालावधी दि.०१/०६/२०१७ रोजी संपुष्टात

येत आहे. खाली नमूद केलेल्या अ.क्र.०१ ते ०९ कर्मचा-यांनी नियमित वेतन श्रेणीत नेमणूक मिळणेकामी मे.उच्च न्यायालय येथे म.न.पा. विरूध्द दाखल याचिका क्र.२५६६/२००५ दाव्यानुसार मे.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार मुदतवाढ देणे आवश्यक आहे.

**प्रपत्र 'अ'**

| अनु. क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीमती. सातकर उज्वला लक्ष्मण | मानधन निदेशक |
| २ | श्री. काळोखे विक्रमसिंह वसंत | मानधन निदेशक |
| ३ | श्री. लांडगे निलेश खुशालचंद | मानधन निदेशक |
| ४ | श्री. दुधाळ भानुदास धर्माजी | मानधन निदेशक |
| ५ | श्रीमती. बोरसे वृंदावनी बन्सीलाल | मानधन निदेशक |
| ६ | श्री. ताठे शहाजी पांडूरंग | मानधन निदेशक |
| ७ | श्री. शिंदे प्रकाश शिवाजी | मानधन निदेशक |
| ८ | श्रीमती. जाधव सीमा यशवंत | मानधन निदेशक |
| ९ | श्री. गावडे किसन दत्तात्रय | मानधन निदेशक |

उपरोक्त अनु.क्र.०१ ते ०९ कर्मचा-यांना मे.उच्च न्यायालय येथे म.न.पा. विरूध्द दाखल याचिका क्र.२५६६/२००५ दाव्यानुसार मे.उच्च न्यायालयाचे यांच्या अंतिम निकालास अधीन राहून व मा.कायदा सल्लागार यांच्या अभिप्रायानुसार दिनांक ०२/०६/२०१८ रोजी एक दिवस सेवाखंड देवून दिनांक ०३/०६/२०१८ (रविवार) रोजी साप्ताहिक सुटटी असल्याने दिनांक ०४/०६/२०१८ते दिनांक ०३/१२/२०१८ पर्यंत सहा महिने कालावधीकरीता हंगामी नियुक्ती देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३२११ विषय क्रमांक - १८
दिनांक – २५/०९/२०१८ विभाग – मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/५/कावि/६३१/२०१८ दि.१७/०९/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड मनपाचे विविध विभागांसाठी लेनोव्हा या उत्पादीत कंपनीचे आवश्यक संगणक संच साहित्य खरेदीकामी केंद्र शासनाकडील Gem, government, e-market plus वर ऑनलाईन Bid व्दारे Bid Number- GEM/2018/B/32803 अन्वये लघुत्तम निविदाकार मे.केजेएम ग्रुप सिस्टीम सोल्युशन्स, ठाणे-४०११०५ यांचेकडून आवश्यक संगणक संच साहित्य खरेदीकामी एकूण

र.रु.२५,४८,८००/- (अक्षरी र.रू.पंचवीस लाख अठठेचाळीस हजार आठशे फक्त) दर स्विकृत करुन, करारनामा करणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३२१२ विषय क्रमांक - १९
दिनांक – २५/०९/२०१८ विभाग – करआकारणी व करसंकलन
सूचक – मा.सारिका लांडगे अनुमोदक – मा.साधना मळेकर
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.कर/मुख्य/५/कावि/५५०/२०१८ दि.१८/०९/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या करसंकलन विभागाअंतर्गत 16 विभागीय कार्यालयामार्फत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनुसार शहरातील इमारती व जमिनींवर कर आकारणी करुन मिळकत कराची वसूली करणेत येते. अधिनियमातील अनुसूची ड प्रकरण 8 मधील नियम 41 मध्ये विहित कालावधीमध्ये मिळकतकराची रक्कम भरणा न करणा-या मिळकतधारकांना प्रती महा 2% दराने मनपा कर शास्ती आकारणेची तरतूद आहे. सन 2010-2011 पासून सदर तरतूदीनुसार मनपाकर शास्ती लागू करणेत आली आहे. चालू आर्थिक वर्षामध्ये पहिल्या व दुस-या सहा माहीची रक्कम भरणा न करणा-या मिळकत धारकांना अनुक्रमे दिनांक 01 ऑक्टोबर व दिनांक 01 जानेवारी पासून प्रती महा 2% दराने मनपाकर शास्ती लागू करणेत आली आहे. थकबाकीदार मिळकत धारकांकडील थकबाकी ही वर्षानुवर्षे मिळकत बंद असल्याने, मालक व भाडेकरु तसेच कौटुंबिक वादामुळे, कोर्टकेस, रस्ता रुंदीकरणामध्ये पूर्णत:/ अंशत: पाडलेल्या मिळकती, तसेच आर्थिक परिस्थिती इत्यादी बाबींमुळे मिळकतकर भरण्याचा नागरिकांचा कल दिसून येत नाही. याबाबत मिळकतधारकांना वेळोवेळी थकीत बिलांवर 2% शास्ती दरमहा आकारली जाते, या संदर्भात प्रेसनोट, जाहिरात फलक, मागणी पत्राद्वारे कळविण्यात आलेले आहे. वर्षानुवर्षे मिळकतकराचा भरणा करत नसल्याने मिळकतकराचे थकबाकीत दिवसेंदिवस वाढ होत आहे. थकीत मिळकतकराची रक्कम जास्तीत जास्त वसूल होण्याचे दृष्टीने नागरिकांना मनपाकर शास्तीमध्ये सवलत/ माफी दिल्यास मिळकत कराची वसूली होणेस मदत होईल. त्यामुळे थकीत असलेली मालमत्ता कराची मूळ रक्कम वसूल होऊन महानगरपालिकेचे आर्थिक उत्पन्नामध्ये वाढ होईल. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमा मधील अनुसूची ड प्रकरण 8 नियम 51 अन्वये शास्ती फी किंवा वसूलीचा खर्च आयुक्तास, आपल्या स्वेच्छा निर्णयानुसार, नियम 41 खालील शास्ती, किंवा नियम 50 खालील फी किंवा वसूलीचा खर्च पूर्णत: किंवा अंशत: माफ करता येईल, अशी तरतूद आहे. मिळकतकर थकबाकीवर आकारणेत आलेल्या मनपा कर शास्तीमध्ये थकबाकीसह मिळकत कराची संपूर्ण रक्कम एक रक्कमी भरणा करणा-या मिळकतधारकांकरिता सवलत/ माफी देणेकामीची अभय योजना खालील प्रमाणे

| अ.क्र. | थकबाकीसह संपूर्ण मिळकतकराची रक्कम भरणेकामी कालावधी | मनपा कर शास्तीमध्ये देणेची माफी/ सवलत टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | दिनांक 01 ऑक्टोबर ते 15 ऑक्टोबर 2018 अखेर | भरणा दिनांकापर्यंत आकारणेत आलेल्या मनपाकर शास्ती रक्कमेचे 90% |
| 2 | दिनांक 16 ऑक्टोबर ते 31 ऑक्टोबर 2018 अखेर | भरणा दिनांकापर्यंत आकारणेत आलेल्या मनपाकर शास्ती रक्कमेचे 75% |

उक्त नमूद प्रमाणे अभय योजना राबविणेकामी व सदर योजनेची नागरिकांमध्ये जनजागृती होण्याच्या दृष्टीने शहरातील मोक्याच्या व वर्दळीचे ठिकाणी जाहिरात फलक लावणे, स्थानिक केबल नेटवर्क, सिनेमा थियेटर, रेडीओ स्टेशन, वर्तमानपत्र इत्यादी साधनाद्वारे प्रसिद्धी करणेकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३२१३ विषय क्रमांक - २०

दिनांक – २५/०९/२०१८ विभाग – स्थापत्य मुख्यालय

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/फ-मुख्य/४१३/२०१८ दि.१८/०९/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.8-1-2018-2019 अन्वये बीआरटी कॉरीडॉर क्र.३ वर सुदर्शन नगर चौक येथे ग्रेड सेपरेटर (समतल विलगक) बांधणेकामी मे.व्ही.एम.मातेरे इन्फ्रा.(इं) प्रा.लि. नि.र.रू.27,86,93,249/- (अक्षरी रक्कम रुपये सत्तावीस कोटी शहाऐंशी लाख त्र्याण्णव हजार दोनशे एकोणपन्नास फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.27,70,96,991/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार विषयांकित काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.27,70,96,991/- पेक्षा 7.70% कमी म्हणजेच र.रु.25,57,60,523/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.11,01,358/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.4,94,900/- = एकुण र.रु.25,73,56,781 /- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/ वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३२१४ विषय क्रमांक - २१

दिनांक – २५/०९/२०१८ विभाग – स्थापत्य ड मुख्यालय

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विलास मडिगेरी

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/ड-मुख्य/४१४/२०१८ दि.१८/०९/२०१८

विषय – नविन प्रभाग क्र.२८ येथील रहाटणी मनपा शाळा ते पिंपळे सौदागर स्मशानभूमी पर्यंतच्या रस्त्याचे यु.टी.डब्ल्यु.टी. पध्दतीने काँक्रीटीकरण करणेबाबत.

विषय क्रमांक २१ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३२१५ विषय क्रमांक - २२

दिनांक – २५/०९/२०१८ विभाग – मध्यवर्ती भांडार

सूचक – मा.यशोदा बोईनवाड अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ – मा.सहा.आयुक्त(भांडार) यांचे जावक क्र.मभां/८/कावि/१२१५/२०१८ दि.१८/०९/२०१८

मा.सहा.आयुक्त(भांडार) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील विविध विभागासाठी आवश्यक संगणक स्टेशनरी पेपर बॉक्स खरेदीकामी ई.नि.सु.क्र.१४/२०१८-१९ अन्वये लघुत्तम कोटेशनधारक मे.विजय प्रिंटर्स, आकुर्डी यांचे आवश्यक कॉम्प्युटर पेपर स्टेशनरी बॉक्स एकुण 1 ते 2 बाबी एकुण 2 बाबी खरेदी करणेकामी एकुण र.रु.११,५४,६००/- (अक्षरी र.रु. अकरा लाख चोपन्न हजार सहाशे फक्त) इतके दर लघुत्तम प्राप्त असुन सदरचे दर स्विकृत करणेत आले आहेत. त्यानुसार मे विजय प्रिंटर्स, आकुर्डी यांना पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेला आहे. सदर झालेल्या खर्च एकुण र.रु.११,५४,६००/- (अक्षरी र.रु. अकरा लाख चोपन्न हजार सहाशे फक्त) चे खर्चाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३२१६ विषय क्रमांक - २३

दिनांक – २५/०९/२०१८

सूचक – मा.साधना मळेकर अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.निर्मला कुटे, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव –

मा.महिला व बालकल्याण समिती सभा ठराव क्र.१२ दि.१८/९/२०१८ अन्वये

महानगरपालिकेच्या सर्व बालवाड्यांमधील मुलांना अन्नमित्र फाउंडेशन व सह्याद्री आदिवासी महिला प्रतिष्ठान या दोन संस्थांमार्फत पोषक आहार देणेस व पोषक आहार वाटप करणे, आहारावर गुणवत्ता नियंत्रण करणे इत्यादी कामे शिक्षण मंडळ विभागामार्फत करण्यास व याकामी आवश्यक असणारी तरतूद नागरीवस्ती विकास योजना विभागाने उपलब्ध करुन देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३२१७ विषय क्रमांक - २४

दिनांक – २५/०९/२०१८

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ – मा.आरती चोंधे, मा.उषा मुंढे यांचा प्रस्ताव –

मा.महिला व बालकल्याण समिती सभा ठराव क्र.१३ दि.१८/९/२०१८ अन्वये ''महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम'' या योजनेच्या कामासंबंधित यापूर्वीचा मा.स्थायी समिती सभेचा १) ठराव क्रमांक २५८३, दिनांक १८/०४/२०१८ हा ठराव रद्द करणेस तसेच सन २०१८-२०१९ या वर्षाच्या सदर योजनेच्या कामासंबंधीतचा २) ठराव क्रमांक २६१२, दिनांक २५/०४/२०१८ या मधील पहिला परिच्छेद म्हणजेच ''नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम या योजने अंतर्गत प्रसिध्द केलेली ई-निविदा रद्द करुन नवीन कोर्सेस सुरु करणे या विषयाबाबत ई-निविदा नोटीस क्रमांक ०१/२०१८/१९ ही प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर निविदेचा स्विकृत कालावधी दिनांक ०९/०४/२०१८ ते ०७/०५/२०१८ पर्यंत आहे. तथापि, ही संपूर्ण ई-निविदा प्रक्रिया रद्द करणेस मान्यता देणेत येत आहे. हा परिच्छेद (मजकूर) कायम ठेऊन या ठरावातील पुढील सर्व मजकुर रद्द करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३२१८ विषय क्रमांक - २५

दिनांक – २५/०९/२०१८

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.साधना मळेकर

संदर्भ – मा.आरती चौंधे, मा.उषा मुंढे यांचा प्रस्ताव –

मा.महिला व बालकल्याण समिती सभा ठराव क्र.१० दि.०४/०९/२०१८ अणि ठराव क्र.१४ दि.१८/९/२०१८ अन्वये नागरवस्ती विकास योजना विभागाकडील महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत महिला, मुले/ मुलींसाठी विविध प्रकारच्या कल्याणकारी योजना राबविल्या जातात.

त्यातील महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम ही एक प्रशिक्षण योजना होती. चालु वर्षापासुन सदर योजनेस पंडीत दिनदयाल उपाध्याय – महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम असे संबोधण्यात यावे. महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम ही प्रशिक्षण योजना मे.अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेने यापूर्वी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत चांगल्याप्रकारे राबविलेली आहे. आवश्यकतेनुसार तात्काळ मनुष्यबळाची उभारणी करणेची क्षमता तसेच मोठ्या प्रमाणावरील कामकाज करणेसाठीची आवश्यक असलेली आर्थिक क्षमता व विशेष करुन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील वस्तीपातळीवरील प्रशिक्षण देण्याचा या संस्थेला भरपूर अनुभव आहे. त्यानुसार तातडीने योजना सुरु होणेकामी, तसेच निविदा पध्दतीने संस्था निवडीसाठी लागणारा प्रदीर्घ कालावधीचा विचार करता, व चालु वर्षाच्या कामासाठीचे संस्थेमार्फत प्रशिक्षणाचे सादर दरही रास्त असलेने प्रशिक्षणास इच्छुक असलेली कुठलीही महिला प्रशिक्षणापासून दिर्घ कालावधीमुळे वंचित राहू नये, प्रशिक्षण लवकरात लवकर सुरु व्हावे या उद्देशाने तसेच वस्तीपातळीवर प्रत्यक्ष केलेल्या चौकशीअंती सदर संस्थेने चांगले काम केले आहे. तसेच त्यांचे कामासंबंधित प्रशिक्षण घेतलेल्या महिलांची तक्रार नसलेबाबतचे निदर्शनास आलेले आहे. तसेच बहुतांशी महिलांची सोबत जोडलेल्या प्रपत्र-अ मधील नमुद विषयांचे प्रशिक्षण देणेची मागणी आहे. त्यामुळे निविदा न मागविता थेट पध्दतीने पंडीत दिनदयाल उपाध्याय – महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम या योजनेअंतर्गत मनपास्तरावर एकुण १४ विषयांचे प्रशिक्षण हे मागील वर्षीच्याच (महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम या योजनेच्या) महिला लाभार्थ्यांसाठीचे पात्रता निकष (अटी व शर्ती), सोबतच्या प्रपत्र-अ मधील नमुद तपशिल व संस्थेमार्फत सादर अभ्यासक्रमानुसार व दरानुसार (सर्व करांसहित) चालुवर्षी दि.३१/०३/२०१९ अखेरपर्यंतच्या कालावधीपर्यंतचे प्रशिक्षणाचे काम हे औद्योगिक प्रशिक्षण संस्था/ केंद्र (पिं.चिं.मनपा.) यांचा अभिप्राय घेऊन व त्यानुसार पुढिल योग्य ती कार्यवाही करुन मे.अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, पुणे/मुंबई यांचेमार्फत देणेस मान्यता देणेत येत आहे. सदरची योजना ही मनपास्तरावर मनपाच्या, यापूर्वीच्या (महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम या योजनेच्या) मान्यता (धोरण) / कार्यपध्दतीनुसार अटी व शर्तीनुसार चालु वर्षाच्या मान्यतेस अधिन राहुन राबविण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रशिक्षण कार्यक्रम पुर्ण केलेल्या प्रत्येक लाभार्थ्याचे नाव, पत्ता इत्यादीसह सविस्तर यादी युनिकोड या फॉन्टमध्ये हार्ड कॉपी व सॉफ्ट कॉपी या स्वरुपात घेण्यात यावी. त्यामुळे मनपाकडील वेब बेस सॉफ्टवेअर मध्ये डाटा एन्ट्री करुन घेण्याची आवश्यकता नाही. त्यानुसार करारनाम्यात तशी दुरुस्ती करण्यास मान्यता देणेत येत आहे. सदर योजनेअंतर्गत महापालिका हद्दीतील महिला / मुलींना ज्ञानात वाढ होऊन त्यांचे आर्थिक उत्पन्न वाढावे, त्यांचे ज्ञान कौशल्यात वाढ व्हावी, विविध व्यवसाय कलांमध्ये महिलांनी पारंगत होवून त्यांचे दैनंदिन जीवनात त्यांना ते उपयुक्त ठरावे. या महिला सक्षमीकरणाच्या/ सबलीकरणाच्या दृष्टीने/ हेतूने महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रमांतर्गत महिलांच्या ज्ञानात वाढीसाठी प्रशिक्षणाचे आयोजन करणेत येत असते. त्यामुळे प्रशिक्षित झालेल्या महिला

लाभार्थ्यांचे सर्वेक्षण करणे व त्यांचे उत्पन्न किती वाढले या संबंधित तपासणीचे कामकाज या योजनेच्या कामकाजात अंतर्भुत नसावे. महिलांच्या ज्ञान कौशल्यात वाढ व्हावी या उद्देशाने सदर योजनेचे आयोजन करणेत येते यासाठीची आवश्यक ती सहभाग शुल्काची रक्कम भरुन महिला प्रशिक्षणास येत असते. मागील वर्षी प्रमाणेच चालू वर्षी देखील शैक्षणिक अर्हता साक्षर ठेऊन यापुर्वीच्या महिलांसाठी विविध व्यवसाय प्रशिक्षण या योजनेअंतर्गत/ महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम या योजनेअंतर्गत ज्या महिला/ मुलींनी प्रशिक्षण घेतलेले आहे. त्यांना देखील चालु वर्षी त्यांच्या मागणीनुसार एकापेक्षा अधिक विषयांचे प्रशिक्षण देणेस तसेच महिला/ मुलींच्या इच्छेनुसार एखादे/ तेच प्रशिक्षण परत देणेस धोरण म्हणुन मान्यता देणेत येत आहे. सदर योजनेमध्ये आवश्यकतेनुसार बदल/ दुरुस्ती करण्याचे/ योजना अंमलबजावणी संबंधीत निर्णय घेऊन योग्य ती कार्यवाही करुन योजना राबविण्या संबंधीतचे सर्व अधिकार मा.आयुक्त सो. यांना देणेस व सदर योजनेअंतर्गत होणारा प्रत्यक्ष खर्च हा पंडीत दिनदयाल उपाध्याय – महिलांसाठी ज्ञान कौशल्य कार्यक्रम या उपलेखाशिर्षातून करणेस मान्यता देणेत येत आहे. सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामध्ये महिला व बालकल्याण योजनेसाठी आर्थिक तरतुद करणेत आलेली आहे. त्यात पंडीत दिनदयाल उपाध्याय – महिलांसाठी ज्ञान कौशल्य कार्यक्रम या उपलेखाशिर्षासह एकुण ५३ उपलेखाशिर्षाचा समावेश आहे. तरी "पंडीत दिनदयाल उपाध्याय – महिलांसाठी ज्ञान कौशल्य कार्यक्रम या उपलेखाशिर्षावर नागरवस्ती विकास योजना विभागाने उर्वरीत ५२ उपलेखाशिर्षातर्गत केलेल्या तरतुदींमधुन व नागरवस्ती विकास योजना विभागाकडील इतर कल्याणकारी योजनेमधील ११ उपलेखाशिर्षांतर्गत केलेल्या व उपलब्ध तरतुदींमधुन पंडीत दिनदयाल उपाध्याय– महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम या योजनेसाठी लाभार्थांच्या प्रतिसादानुसार प्रशिक्षणाचे वाढीव खर्चाकामी आवश्यकतेनुसार रक्कमा वर्ग करणेस व त्यानुसार पंडीत दिनदयाल उपाध्याय – महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम" योजना ही मे.अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, पुणे/मुंबई यांचेमार्फत दि.३१/०३/२०१९ अखेरपर्यंतच्या कालावधीत राबविणेकामी व योजनेच्या अंमलबजावणी कामीच्या धोरणास व प्रत्यक्ष होणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. चालु वर्षाच्या राहिलेल्या उर्वरित कालावधी विचार करता, प्रशिक्षण सुरु होऊन ते वर्षअखेरपर्यंत पुर्ण होणे अतिशय जिकीरीचे आहे. तथापि वस्तीपातळीवरुन प्रशिक्षण सुरु करणेकामी महिलांची वारंवार मागणी होत आहे. त्यामुळे प्रशिक्षणातील विलंब टाळण्याच्या दृष्टीने तसेच प्रशिक्षणाच्या विलंबा बाबतच्या कुठल्याही तक्रारीस वाव राहु नये या हेतूने मे. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, पुणे/ मुंबई यांना वस्तीपातळीवरुन इच्छुक महिला गटांच्या प्रशिक्षणाच्या अटी व शर्ती नुसारच्या कागदपत्रांच्या फाईल्स स्विकारणेस मान्यता देणेत आली आहे अशा प्रकारच्या सुचना प्रशासनाकडुन सदरील संस्थेस देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३२१९ विषय क्रमांक - २६

दिनांक – २५/०९/२०१८

सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.निर्मला कुटे, मा.मिनल यादव यांचा प्रस्ताव –

विषय – नागरवस्ती विकास योजना विभागाकडील महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतील सर्व बालवाड्यांच्या भिंती ३डी (3D) पेंटींगद्वारे बोलक्या करणेबाबत.

विषय क्रमांक २६ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३२२० विषय क्रमांक - २७

दिनांक – २५/०९/२०१८

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ – मा.आरती चौंधे, मा.हिराबाई घुले यांचा प्रस्ताव –

मा.महिला व बालकल्याण समिती सभा ठराव क्र.१७ दि.१८/९/२०१८ अन्वये १४ नोव्हेंबर २०१८ बालदिन निमित्त बालजत्रेचे आयोजन अनुक्रमे १३ व १४ नोव्हेंबर या दोन्ही दिवशी सांगवी येथील पी.डब्ल्यू.डी. मैदान व भोसरी येथील गाव जत्रा मैदान या दोन्ही ठिकाणी करण्यात यावे. या बालजत्रेमध्ये लहान मुलांची खेळणी व विविध मनोरंजनाचे खेळ तसेच खाऊ वाटप करण्यात यावे. तसेच मुलांसाठी फॅन्सी ड्रेस स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा अशा प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन व बक्षीस वाटप करण्यात यावे. तसेच पालकांसाठी प्रबोधनपर मुलांचे आरोग्य व आहार या विषयी मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात यावे. तरी याची कार्यवाही नागर वस्ती विकास योजना विभागाच्या वतीने करण्यात यावी. सदर कामाची प्रचार प्रसिध्दी व आमंत्रण देण्याची कार्यवाही माहिती व जनसपंर्क विभागाच्या वतीने करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३२२१ विषय क्रमांक - २८

दिनांक – २५/०९/२०१८

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.आरती चौंधे, मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव –

विषय – महापालिकेचे प्राथमिक शिक्षण विभागाकडील बालवाड्यातील शिशु/ बालकांना स्वच्छता कीट साहित्य खरेदीबाबत.

विषय क्रमांक २८ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३२२२ विषय क्रमांक - २९

दिनांक – २५/०९/२०१८

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७/कावि/४२५/२०१८ दि.२९/०६/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.३६ दि.१४/९/२०१८ अन्वये क्रीडा धोरणात एशियन क्रीडा स्पर्धेत सुवर्ण पदक विजेत्या खेळाडूस २,००,०००/- आर्थिक सहाय्य अदा करणेचे धोरण आहे. कु. नुपुर लक्ष्मण मोरे यांनी ७ वी एशियन योगा स्पोर्टस चॅम्पियनशीप २०१७ सिंगापूर येथे झालेल्या स्पर्धेत सुवर्ण पदक प्राप्त केल्यामुळे र.रू.२,००,०००/- आर्थिक सहाय्य अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३२२३ विषय क्रमांक - ३०

दिनांक – २५/०९/२०१८

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७/कावि/४२६/२०१८ दि.२९/०६/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.३७ दि.१४/९/२०१८ अन्वये क्रीडा धोरणात एशियनक्रीडा स्पर्धेत सुवर्ण पदक विजेत्या खेळाडूस २,००,०००/- आर्थिक सहाय्य अदा करणेचे धोरण आहे. सौ.रूपाली गणेश तरवडे यांनी ७ वी एशियन योगा स्पोर्टस चॅम्पियनशीप २०१७ सिंगापूर येथे झालेल्या स्पर्धेत सुवर्ण पदक प्राप्त केल्यामुळे र.रू.२,००,०००/- आर्थिक सहाय्य अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३२२४ विषय क्रमांक - ३१
दिनांक – २५/०९/२०१८ विभाग – क्रीडा
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७/कावि/४७२/२०१८ दि.०७/०७/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.३८ दि.१४/९/२०१८ अन्वये श्री.देवदत्त वसंत भारदे, चिखली ह्याने २६ व्या जागतिक योगासन चॅम्पियनशीप २०१८ अर्जेंटिना या स्पर्धेस जाऊन आल्याने त्याने योगा फेडरेशन ऑफ इंडिया या संस्थेस र.रू.२,२०,०००/- स्वत: दिल्याने म.न.पा.नियमानुसार र.रु.१,००,०००/- (अक्षरी र.रु.एक लाख फक्त) आर्थिक सहाय्य अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३२२५ विषय क्रमांक - ३२
दिनांक – २५/०९/२०१८ विभाग – क्रीडा
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७/कावि/४५८/२०१८ दि.२९/०६/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.३९ दि.१४/९/२०१८ अन्वये क्रीडा धोरणात एशियनक्रीडा स्पर्धेत सुवर्ण पदक विजेत्या खेळाडूस र.रु.२,००,०००/- आर्थिक सहाय्य अदा करणेचे धोरण आहे. श्री.चंद्रकांत श्रीरंग पांगारे यांनी ७ वी एशियन योगा स्पोर्टस चॅम्पियनशीप २०१७ सिंगापूर येथे झालेल्या स्पर्धेत सुवर्ण पदक प्राप्त केल्यामुळे त्यांना र.रू.२,००,०००/- आर्थिक सहाय्य अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३२२६ विषय क्रमांक - ३३
दिनांक – २५/०९/२०१८ विभाग – क्रीडा
सूचक – माविकास डोळस अनुमोदक – मा.अर्चना बारणे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/३६९/२०१८ दि.०१/०९/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.४० दि.१४/९/२०१८ अन्वये मनपाची संत तुकाराम नगर व्यायामशाळा ही हनुमान स्पोटर्स अँकडमी, चिखली या

संस्थेस सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेत आलेली असून या व्यायामशाळेची करारनाम्याची मुदत दि.१०/१०/२०१७ ते दि.०९/०९/२०१८ रोजी संपुष्टात येत असल्याने हनुमान स्पोटर्स ॲकडमी, चिखली या संस्थेच्या दि.२१/०८/२०१८ च्या पत्रान्वये मनपाचे क्रीडा धोरणानुसार नव्याने ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रू.२०००/- मनपाकडून देवून सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास आदेशाच्या तारखेपासून पुढील मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३२२७ विषय क्रमांक - ३४

दिनांक – २५/०९/२०१८

सूचक – मा.यशोदा बोईवाड अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.अनुराधा गोफणे, मा.अश्विनी वाघमारे यांचा प्रस्ताव –

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.४२ दि.१४/९/२०१८ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने, महाराष्ट्र राज्य खो खो असो. पुणे जिल्हा खो खो असो. यांच्या मान्यतेने शिवाजी उदय मंडळ चिंचवड येथे महापौर चषक राज्यस्तरीय खो-खो स्पर्धा आयोजित करण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३२२८ विषय क्रमांक - ३५

दिनांक – २५/०९/२०१८

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.अंबरनाथ कांबळे, मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव –

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.४३ दि.१४/९/२०१८ अन्वये प्रभाग क्र.२० मधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुल हे जागृती स्पोर्टस सोशल फाऊंडेशन, संत तुकारामनगर यांना पिंपरी चिंचवड मनपाकडून ११ महिन्याच्या सेवाशुल्कावर देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३२२९ विषय क्रमांक - ३६

दिनांक – २५/०९/२०१८

सूचक – मा.यशोदा बोईनवाड अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ – मा.अंबरनाथ कांबळे, मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव –

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.४४ दि.१४/९/२०१८ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने प्रभाग क्र.२० डॉ.बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुल, संत तुकारामनगर, पिंपरी-१८ येथे महापौर चषक जिल्हास्तर बॉक्सिंग स्पर्धा आयोजित करणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३२३० विषय क्रमांक - ३७

दिनांक – २५/०९/२०१८

सूचक – मा.साधना मळेकर अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.सुजाता पालांडे, मा,अपर्णा डोके यांचा प्रस्ताव –

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.४६ दि.१४/९/२०१८ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने, महाराष्ट्र राज्य हॉलीबॉल असो. पुणे जिल्हा हॉलीबॉल असो.यांच्या मान्यतेने बॅडमिंटन गंगोत्री पार्क भोसरी येथे महापौर चषक राज्यस्तरीय हॉलीबॉल स्पर्धा आयोजित करण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३२३१ विषय क्रमांक - ३८

दिनांक – २५/०९/२०१८ विभाग – वाय.सी.एम.एच

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.सहा.आयुक्त (भांडार) यांचे पत्र क्र.YCMH/भांडार/२/कावि/३९४/२०१८ दि.२१/०९/२०१८

मा.सहा.आयुक्त (भांडार) यांनी शिफारस केले प्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या शस्त्रक्रिया विभागातील RMS कंपनीच्या नादुरुस्त सी-आर्मच्या (Sr.No.H1503154) दुरुस्तीसाठी आवश्यक स्पेअर पार्टस उत्पादित कंपनीच्या इंजिनियरच्या सर्व्हिस रिपोर्टनुसार बदलणे आवश्यक असल्यामुळे मे.श्री कंन्स्ट्रक्शन, निगडी यांनी खरेदी करुन ते बदलण्यात आलेले आहे. त्यानुसार संबंधित सी-आर्मचे अधिकृत AMC धारक मे.श्री कंन्स्ट्रक्शन, निगडी यांचे मनपा अधिनियम अनुसुची ड प्रकरण ५(२)(२) नुसार थेट पध्दतीने

खरेदी करण्यात आलेल्या पार्टसचे एकूण र.रु.३५,९९०/- चे बील अदा करण्यास व त्यासाठी होणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३२३२ विषय क्रमांक - ३९

दिनांक – २५/०९/२०१८ विभाग – नगररचना व विकास

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विलास मडिगेरी

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/६/२३१५/२०१८ दि.१७/०९/२०१८

विषय – पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील Townplanning schemes करणेबाबत पॅनल नेमणूकीबाबत.

विषय क्रमांक ३९ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३२३३ विषय क्रमांक - ४०

दिनांक – २५/०९/२०१८ विभाग – नगररचना व विकास

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/०६/२३०५/२०१८ दि.११/०९/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील हवाई छायाचित्रे ही मनपाच्या सर्व विभागांना उपयुक्त असल्याने सदर छायाचित्रे पुणे महानगर प्रादेश विकास प्राधिकरण यांचेकडून विकत घेण्याचे दि.०५/०७/२०१८ रोजीच्या मा.आयुक्त कक्षात झालेल्या बैठकीत ठरले, छायाचित्रे उपलब्ध करून देणेकामी त्याप्रमाणे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे यांनी संदर्भियान्वये मनपास प्रस्ताव सादर केला असुन त्याप्रमाणे र.रू.५३,९३,९६९/- एवढा खर्च कळविला आहे.

| अ.क्र. | तपशील | दर रूपये प्रती चौ. कि. मी. | क्षेत्रफळ चौ. कि. मी. | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | Aerial Photography Charges | र.रू.२२०००/- | २०६.७८ | र.रू. ४५, ४९,१६०/- |
| २ | Additional ground control | र.रू.११,०००/- per GCP | २ | र.रू. २२,०००/- |
| | | | | र.रू.४५, ७१, १६०/- |
| | | | GST १८% | ८,२२,८०९/- |
| | | | एकुण | र.रू. ५३, ९३,९६९/- |

सबब पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे यांचे कडून छायाचित्रे उपलब्ध करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३२३४ विषय क्रमांक - ४१
दिनांक – २५/०९/२०१८ विभाग – फ क्षेत्रीय, स्थापत्य
सूचक – मा.सारिका लांडगे अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड
संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.फक्षेका/स्था/कावि/६७०/२०१८ दि.१८/०९/२०१८

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्राअंतर्गत विविध चौकांच्या सुशोभीकरणाची कामे सन २०१८-१९ चे अर्थसंकल्पामध्ये प्रस्तावित केलेली आहेत. सदर प्रस्तावीत विकास कामे हि वैशिष्ट्यपूर्ण स्वरूपाची आहेत व त्यात आकर्षक व नावीन्यपूर्ण संकल्पना राबवून चौकांचे सुशोभीकरण करणे, वाहतूक नियमांशी सुसंगत अशी वाहतूक बेटे निर्माण करणे तसेच इतर वाहतूक सोई सुविधा अद्यायावत करणे इत्यादी कामांचा समावेश आहे. सदरची कामे करणे करिता पुरेसे तांत्रिक नैपुण्य महानगरपालिकेकडील अभियंताकडे उपलब्ध असले तरी काही वेळा अपु-या कर्मचारी वर्गामुळे अथवा काही प्रसंगी गुंतागुंतीचे तांत्रिक प्रश्न, आधुनिक तंत्रज्ञानाची गरज, पर्यावरण विषयक अभ्यास तसेच खाजगी कारणातुन अभ्यास व तत्सम बाबी, सुसाध्यतेची पडताळणी, संशोधनात्मक अभ्यास तसेच खाजगीकरणातुन करावयाच्या प्रकल्पांसाठी कायदेविषयक, अर्थविषयक अन्वेशन अशा बाबींसाठी वास्तुविशारद किंवा तज्ञ नेमण्याची आवश्यकता आहे. या प्रकल्पांतर्गत विविध नाविन्यपूर्ण बाबींचा समावेश करणे आवश्यक आहे.त्याकरिता विस्तृत व परिपूर्ण संकल्पचित्रे व आराखडे तयार करणे, काम वैशिष्ठपूर्ण स्वरूपाचे असलेने सार्वजनिक बांधकाम विभागाकडील मंजूर दरसूचीत समाविष्ठ नसणा-या विविध बाबींचे दरपृथ:करण तयार करून त्यास मान्यता घेणे, निविदा विषयक आवश्यक कामे करणे इ. निविदा पुर्व कामे करणेकरिता तसेच तांत्रिकदृष्टया आराखड्याप्रमाणे काम करुन घेणे, प्रकल्पाचे दैनंदिन कामावर देखरेख ठेवणे इ. निविदापश्च्यात कामे चोखपणे होणे आवश्यक आहे .या सर्व बाबी विचारात घेऊन मनपाच्या वास्तुविशारद पॅनेलवर असलेले या क्षेत्रातील तज्ञ वास्तुविशारद यांची नेमणुक करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने प्रस्तावात नमुद केलेल्या मनपाचे क्षेत्रीय कार्यालयातील विकास कामांना त्यांचे नावासमोर दर्शविलेले वास्तुविशारद म्हणून नेमणूक करणेबाबत तसेच त्याकामी देय असलेली फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३२३५ विषय क्रमांक - ४२

दिनांक – २५/०९/२०१८ विभाग – मध्यवर्ती भांडार

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.सहा.आयुक्त(भांडार) यांचे पत्र क्र.मभां/८/कावि/१२१३/२०१८ दि.१८/०९/२०१८

मा.सहा.आयुक्त(भांडार) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागांतर्गत कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेकरीता व जनजागृती करणेकरीता राबविण्यात येणा-या राष्ट्रीय व सामाजिक कार्यक्रमांकरीता आवश्यक/नियमितपणे लागणारे छपाई साहित्य वर्षभराकरीता छपाई करुन घेणेकामी निविदा क्रं.०८/२०१८-१९ अन्वये १) मे.अमृत मुद्रणालय, चिंचवड यांनीबाब क्रं ०१ साठी प्रति नग ११.३० पैसे प्रमाणे एकुण र.रु.७,९१,०००/- लघुत्तम दर प्राप्त झाले आहे. सदरचे दर हे अंदाजपत्रकिय र.रु.८,५४,०००/- पेक्षा -७.३७ टक्कने कमी आहे. २) मे.विजय प्रिंटर्स यांचे बाब क्रं ०२ साठी प्रति नग १४.४५ पैसे प्रमाणे एकुण र.रु.१०,११,५००/- लघुत्तम दर प्राप्त झाले आहे. सदरचे दर हे अंदाजपत्रकिय र.रु १०,८१,५००/- पेक्षा -७.७६ टक्कने कमी आहे. वरिल प्रमाणे एकुण ०१ ते ०२ एकुण २ बाबीसाठी एकुण र.रु.१८,०२,५००/- इतका खर्च अपेक्षीत आहे सदरचा खर्च हा एकुण र.रु.१९.३५,५००/- पेक्षा -६.८७ टक्कने कमी असलेने सदरचे दर स्विकृत करणेस मान्यता देणेत आलेली आहे. त्यानुसार दोनही निविदाधारकानां विविध विभागासाठी आवश्यक छपाई साहित्य पुरविणेकामी मुळ पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेला आहे. सदर झालेल्या खर्च एकुण र.रु.१८,०२,५००/- (अक्षरी र.रु.अठरा लाख दोन हजार पाचशे फक्त) चे खर्चाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३२३६ विषय क्रमांक - ४३

दिनांक – २५/०९/२०१८ विभाग – ग क्षेत्रीय, स्थापत्य

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.गक्षे/स्था/कावि/८४३/२०१८ दि.१९/०९/२०१८

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मा.महापालिका सभा ठराव क्र.१७७, दि.२०/०४/२०१८ व २३६, दि.२०/०७/२०१८ अन्वये प्रशासकीय मान्यता देणेत आलेल्या कामांच्या ग क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील स्थापत्य विभागाअंतर्गत प्रस्तावात नमूद विकास कामे करणेसाठी निविदा पुर्व व निविदा पश्र्चात आर्किटेक्ट व प्रकल्प सल्लागार नेमणेकामी व त्यांना अदा करावयाच्या फी च्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३२३७ विषय क्रमांक - ४४
दिनांक – २५/०९/२०१८ विभाग – ड क्षेत्रीय, स्थापत्य
सूचक – मा.करूणा चिंचवडे अनुमोदक – मा.साधना मळेकर
संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.डक्षे/स्था/कावि/१२३९/२०१८ दि.१९/०९/२०१८

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मा.महापालिका सभा ठराव क्र.२३६, दि.२०/०७/२०१८ अन्वेय प्रशासकीय मान्यता देणेत आलेल्या कामांच्या ड क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील स्थापत्य विभागाअंतर्गत प्रस्तावात नमुद विकास कामे करणेसाठी निविदा पुर्व व निविदा पश्र्चात आर्किटेक्ट व प्रकल्प सल्लागार नेमणेकामी व त्यांना अदा करावयाच्या फी च्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजात दाखल करून घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक -३२३८ विषय क्रमांक - ४५
दिनांक – २५/०९/२०१८ विभाग – फ क्षेत्रीय, विद्युत
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त यांचे पत्र क्र.फक्षेका/वि/जा/३१०/२०१८ दि.२५/०९/२०१८

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

निगडी येथील से.क्र.२२ येथील विद्युत दाहीनीची वार्षिक पध्दतीने चालन व देखभाल करणेचे कामास दि.१९/९/२०१८ पर्यंत मुदवाढ देऊन येणा-या वाढीव खर्च र.रू.९,४८,७६२/- (अक्षरी र.रू.नऊ लाख आठ्ठेचाळीस हजार सातशे बासष्ठ फक्त) चे खर्चास मान्यता देऊन सदरचे काम मं.एन.सी.वाय एन्टरप्रायझेस यांचेकडून ३.२२% कमी या पूर्व मंजूर दराने करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३२३९ विषय क्रमांक - ४६
दिनांक – २५/०९/२०१८ विभाग – पाणीपुरवठा
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.पापु/६/कावि/१३९/२०१८ दि.२५/०९/२०१८

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.क्र.५/१/२०१८-१९ अन्वये मनपाच्या थेरगाव गावठाण, थेरगाव स.नं.९ ,थेरगाव लक्ष्मणनगर , काळाखडक वाकड व काळाखडक बुस्टर,पुनावळे येथील पंप हाऊसचे चालन करणेकामी मे.शुभम उद्योग निविदा रक्कम रू.४३,८५,२४४/- (अक्षरी र.रू.त्रेचाळीस लाख पंच्याऐंशी हजार दोनशे चव्वेचाळीस फक्त) पेक्षा ५०.९६% जादा निविदा स्विकृती योग्य दरापेक्षा ३.१९% ने कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.६६,१९,९६४/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३२४० विषय क्रमांक - ४७
दिनांक – २५/०९/२०१८ विभाग – पाणीपुरवठा
सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.साधना मळेकर
संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.पापु/६/कावि/१४०/२०१८ दि.२५/०९/२०१८

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.क्र.५/२/२०१८-१९ अन्वये मनपाच्या सांगवी गावठाण, सांगवी पीड्ब्ल्युडी, सांगवी स.नं.८४, पिंपळे गुरव व दापोडी येथील शुद्ध पाणीपुरवठा करणा-या पंप हाऊसचे चालन करणेकामी (२०१८-१९) मे.शुभम उद्योग निविदा रक्कम रू.४३,६९,३८०/- (अक्षरी र.रू.त्रेचाळीस लाख एकोणसत्तर हजार तीनशे ऐंशी फक्त) पेक्षा ५०.४८% जादा निविदा स्विकृती योग्य दरापेक्षा ३.१९% ने कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.६५,७५,०४३/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३२४१ विषय क्रमांक - ४८
दिनांक – २५/०९/२०१८ विभाग – पाणीपुरवठा
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.पापु/६/कावि/१४१/२०१८ दि.२५/०९/२०१८

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.क्र.५/३/२०१८-१९ अन्वये मनपाच्या कृष्णानगर, स.नं.२२, पाटीलनगर, जाधववाडी, से १० व गवळीमाथा येथील पंप हाऊसचे चालन करणेकामी (२०१८-१९) मे.शुभम उद्योग निविदा रक्कम रू.४२,२३,१६०/- (अक्षरी र.रू.बेचाळीस लाख तेवीस हजार एकशे साठ फक्त) पेक्षा ५१.३७% जादा निविदा स्विकृती योग्य दरापेक्षा ३.१९% ने कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.६३,९२,५९७/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३२४२ विषय क्रमांक - ४९
दिनांक – २५/०९/२०१८ विभाग – पाणीपुरवठा
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.पापु/६/कावि/१४२/२०१८ दि.२५/०९/२०१८

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.क्र.५/४/२०१८-१९ अन्वये मनपाच्या रहाटणी, स.नं.९६, लांडेवाडी, दिघी, च-होली व बोपखेल येथील पंप हाऊसचे चालन करणेकामी (२०१८-१९) मे.शुभम उद्योग निविदा रक्कम रू.३४,८७,५७२/- (अक्षरी र.रू.चौतीस लाख सत्त्याऐंशी हजार पाचशे बाहत्तर फक्त) पेक्षा ५०.१८% जादा निविदा स्विकृती योग्य दरापेक्षा ३.१९% ने कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.५२,३७,६३५/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले

**(ममता विनायक गायकवाड)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक- नस/३/कावि/११३९/२०१८
दिनांक - २५/०९/२०१८

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

(क्र.पापु/मुख्य/२९२/२०१८ दि.११/९/२०१८ विषय क्र.५ चे लगत)

विषयपत्र क्र.पापु/मुख्य/ २९२ /२०१८, दि.~~३०/०८/~~ ११/०९/२०१८ सोबतचे

परिशिष्ट 'अ'

विषयः- पाणीपुरवठा धोरण

.. झोपडपट्ट्यांमधील निवासी नळजोडांचे पाणी दर तसेच झोपडपट्ट्यांमधील अनाधिकृत निवासी नळजोड नियमित करणेबाबत..

मा.महापालिका सभा ठराव क्र.१४७ दि.२८/०२/२०१८ व मा.महापालिका सभा ठराव क्र.१८७, दि.२०/०४/२०१८ च्या अनुषंगाने पाणीपट्टी दर बदल व अनाधिकृत नळजोड नियमित करणे संदर्भात आदेश क्र.जशुके/पापु/१९३/२०१८, दि.०७/०६/२०१८ अन्वये मा.आयुक्त यांनी आदेश निर्गमित केले आहेत.

उपनिर्दिष्ट आदेशांमध्ये पाणीपट्टीबाबतचे दर आहेत. त्यामध्ये झोपडपट्टीसाठीचे वेगळे धोरण दर्शविण्यात आले आहे. सदर धोरण प्रस्तावित करताना मीटर पध्दतीने पाणीपुरवठा करताना Cross-subsidized पध्दतीने दर निश्चित केले आहेत. तसेच अनाधिकृत नळकनेक्शन नियमित करणेचे धोरणही सदर आदेशात नमूद आहे.

घोषित / अघोषित / अनाधिकृत झोपडपट्ट्यांमधील अनाधिकृत नळजोड नियमित करणेस झोपडीधारकांचा चांगला व सकारात्मक प्रतिसाद मिळणेसाठी झोपडपट्ट्यांमधील अनाधिकृत नळजोड नियमित करणेकामी अनामत रक्कम, दंड व पाणीपट्टी (मागील वर्षांची) रक्कम कमी करून ती खालीलप्रमाणे असावी.

झोपडपट्टीमधील अनाधिकृत नळजोड नियमित करणे –

प्रकार – निवासी

व्यास – १५ मि.मी.

मालकी – स्वतः मालक अथवा भाडेकरू

| | |
|---|---|
| अनामत रक्कम | रू.१५००/- |
| दंड रक्कम | रू. ५००/- |
| पाणीपट्टी रक्कम<br>(१८०x५ वर्षे =९००) | रू. ९००/- |
| एकूण रक्कम | रू.२९००/- |

तसेच घोषित / अघोषित / अनाधिकृत झोपडपट्ट्यांच्या लगत वाढलेल्या अनाधिकृत झोपड्यांचे अनाधिकृत नळजोड नियमित करताना त्यानांही झोपडपट्ट्यांचेच धोरण वापरावे.

झोपडपट्ट्यांमधील तसेच झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांमधील अधिकृत नळजोडांची पाणीबीले तयार करून वितरण करणे व वसुली करणे आवश्यक आहे. याकामी यापुर्वी वेळोवेळी सक्षम समितीने/ सभेने जे दर / प्रतिवर्ष रक्कम मंजूर केलेल्या आहेत, त्या बाबी निरस्त करून खालीलप्रमाणे प्रतिवर्ष रक्कम पुर्वलक्षी प्रभावाने (थकबाकीच्या वर्षापासून) वसूल करावी. तसेच झोपडपट्ट्यांमधील तसेच झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील नळजोडांच्या थकबाकीवर कोणत्याही प्रकारचा दंड आकारू नये.

मा.महापालिका सभा दि.२० /०४ /२०१८ च्या ठराव क्र.१८७ च्या उपसुचनेनुसार झोपडपट्टीतील तसेच झोपडपट्टी प्रकल्पातील ग्राहकांना प्रतिवर्ष रक्कम रू.१००/- पाणीपट्टी आकारणेबाबत ठराव मंजूर आहे.

तथपि, हा दर फारच कमी असल्याने त्याचा तांत्रिकदृष्ट्या फेरविचार होऊन त्यात खालीलप्रमाणे सुधारणा व्हावी.

(कृपया मागील पानावर.)

१. SRA / BSUP प्रकल्पातील नळजोड तसेच झोपडपट्टीतील नळजोड यासाठी मीटरने (Volumetric) पुर्व मंजूर दर पुर्वीप्रमाणेच पुढीलप्रमाणे राहतील.

(प्रति कुटुंब प्रति महिना)

| अ.क्र. | Lpcd | प्रति माह पाण्याचा वापर (लिटरमध्ये) | पाणी दर प्रति १००० लिटरसाठी सन २०१८-१९ |
|---|---|---|---|
| १ | ४० | १ ते ६००० | रू.०.००/- |
| २ | ४१-१०० | ६००१ ते १५००० | रू.२.००/- |
| ३ | १००१-१५० | १५००१ ते २२५०० | रू.३.००/- |
| ४ | १५१-२०० | २२५०१ ते ३०००० | रू.८.००/- |
| ५ | २०१ च्या पुढे | ३०००१ व त्यापुढे | रू.१२.००/- |

ज्या नळजोडांना जलमापक (Water meter) आहेत त्या नळजोडांना उपरोक्तप्रमाणे पाणीबील देणे योग्य राहील. तथापि, झोपडपट्टीतील / झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील ज्या नळजोडांना मीटर नाहीत / मीटर सुस्थितीत नाहीत / मीटर बंद / रिडींग घेता येत नाही,. अशा नळजोडांना खालील पध्दतीने पाणीबील देण्यात यावे.

अ. झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प
वापर १३५ lpcd गृहीत धरून (प्रति सदनिका प्रति महिना पाणी वापर २०.२५ KL)

| | | | |
|---|---|---|---|
| ४० lpcd | ६ KL | ६x० | = ००.०० |
| ४१ to १०० lpcd | ९ Kl | ९x२ | =१८.०० |
| १०१ to १३५ plcd | ५.२५ KL | ५.२५x३ | =१५.७५ |
| | ---------------- | | ---------------------- |
| | २०.२५ KL | | ३३.७५ |

Round upto Rs.३५.००

प्रति सदनिका प्रति महिना –रू.३५/-

इमारतीच्या प्रत्येक नळजोडास याप्रमाणे सदनिकाच्या प्रमाणात मासिक पाणीबील देणेत यावे. तसेच सदर प्रकल्पांना सदर इमारतीमध्ये नागरीक राहायला आल्याच्या तारखेपासून रू.३५/- प्रति महिना याप्रमाणे पुर्वलक्षी प्रभावाने पाणीबील आकारणेत यावे. म्हणजेच थकबाकी वसूलीसाठी सदरचा दर वापरणेत यावा.

आ. झोपडपट्ट्यांमधील नळजोड
१. झोपडपट्ट्यांमधील वैयक्तिक नळजोड – १५ mm dia –
(९० lpcd प्रमाणे प्रति झोपडी प्रति महिना पाणी वापर १३.५ KL).

| | | | |
|---|---|---|---|
| ४० lpcd | ६ KL | ६x० | = ०.०० |
| ४१ to १०० lpcd (५०x५x३०=७५००lit) | ७.५ Kl | ७.५x२ | =१५.०० |
| | | | ---------------------- |
| | | एकूण | १५.०० |

प्रति नळजोड / प्रति झोपडी
(वैयक्तिक नळजोड प्रकरणी))

प्रतिवर्ष पाणी आकार - १५x१२=रू..१८०/- प्रतिवर्ष

तसेच याच दराने पुर्वलक्षी प्रभावाने थकबाकी वसूल करण्यात यावी.

(कृपया पुढील पानावर)

२. झोपडपट्टीतील Group Connection (गट नळजोड) १५ mm dia (५ कुटूंबे) ७० lpcd प्रमाणे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४० lpcd | ४०x५x५x३०/१००० = ३० KL | | ३०x० | = ००.०० |
| ४१ to ७० lpcd | ३०x५x५x३०/१०००=२२.५ Kl | | २२.५x२ | =४५.०० |
| | | एकूण | | ४५.०० |

प्रति ग्रुप नळजोड - ५ कुटुंब यासाठी वार्षिक पाणी आकार

प्रतिवर्ष पाणी आकार - ४५x१२=रू.५४०/- प्रतिवर्ष

तसेच, याच दराने पुर्वलक्षी प्रभावाने थकबाकी वसूल करण्यात यावी. तसेच झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील व झोपडपट्ट्यांमधील नळजोडांच्या थकबाकीवर दि.३१/०३/२०१८ पर्यंत कोणताही दंड आकारू नये.

उपरोक्तप्रमाणे झोपडपट्टीतील निवासी वैयक्तिक नळजोडाची तसेच ग्रुप कनेक्शनची पाणीबीले वार्षिक पध्दतीने देणेत यावीत.

अनाधिकृत नळजोड नियमित करणेच्या धोरणामध्ये जे अनाधिकृत नळजोड नियमानुकूल नाहीत ते नियमित होणार नाहीत व ते त्वरीत बंद करण्यात यावेत.

यापुढे, अनाधिकृत नळजोड घेतल्यास ती पाण्याची चोरी म्हणून सदर नागरीकाचे विरूध्द फौजदारी कारवाई करावी व तश्या प्रकारे गुन्हा दाखल करावा. तसेच पाणीबील थकबाकीदाराची थकबाकी एक वर्षापेक्षा जास्त काळ असेल तर त्याचे विरोधात रितसर गुन्हा नोंदवणेत यावा व योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करणेत यावी.

अनाधिकृत नळजोड नियमित करणेची मुदत ३० जून २०१८ पर्यंत होती. तथापि, सदर मुदत ३१ डिसेंबर २०१८ पर्यंत वाढविणेत यावी. तदनंतर, पुर्वमंजूर धोरणाप्रमाणे प्रतिमहिना अतिरिक्त शुल्क आकारणेत यावे.

उपर्निर्दिष्ट सर्व बदल वगळता मा.आयुक्त यांचे आदेश क्र.जशुके/पापु/१९३/२०१८, दि.०७/०६/२०१८ मधील उर्वरित बाबी जश्याच्या तश्या लागू राहतील.

सदर धोरणाच्या अर्थनिष्पत्तीबाबत (Interpretation) अथवा अन्य कोणताही प्रासंगिक वाद उद्भवल्यास त्या संबधी निर्णय घेण्याचे अधिकार मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८ यांना राहतील.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८

## (क्र.बक्षे/लेखा/९/कावि/२५८/२०१८ दि.१४/०९/२०१८ विषय क्र.१३ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. उदयान विभाग
क्रमांक.उदयान/६/कावि/[illegible]/२०१८
दिनांक [illegible] /०९/२०१८

प्रपत्र 'अ'

निविदा कार्यवाही पुर्ण झालेने मा.स्थायी समिती समोर अवलोकनार्थ सादर.

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा तारीख | आदेश क्रमांक | आदेशाचा दिनांक | निविदा र.रु. | स्विकृती दर | निविदा खर्चाची मान्यता रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मे.सदिच्छा कन्सट्रक्शंन | ०१/०२/२०१८-१९ | सावित्रीबाई फुले उदयान भाग २ जगताप डेअरी देखभाल व संरक्षण करणेबाबत. | १३/०८/२०१८ | क्र.उदयान/६/कावि/८६९/२०१८ | १६/०८/२०१८ | २१,३३,६००/- | १२.६० % कमी | १८,६४,७६६/- |
| २. | मे.कोमल स्वंयरोजगार सेवा सह.संस्था मर्या. | ०१/०३/२०१८-१९ | म.न.पा.चे दादा दादी उदयान देखभाल व संरक्षण करणेबाबत. | ३१/०७/२०१८ | क्र.उदयान/६/कावि/८१८/२०१८ | ०१/०८/२०१८ | ९,१४,४००/- | २७.०० % कमी | ६,६७,५१२/- |
| ३. | मे.धनश्री इंटरप्रायजेस | ०१/०४/२०१८-१९ | म.न.पा.चे विरंगुळा केंद्र, इंदिरा गांधी उदयान व नाना नानी उदयान देखभाल व संरक्षण कामाबाबत. | ०१/०९/२०१८ | क्र.उदयान/६/कावि/९१८/२०१८ | ०४/०९/२०१८ | ७,९२,४८०/- | २७.१८ % कमी | ५,७७,०८४/- |
| ४. | मे.जी.बी.एंटरप्रायजेस | ०१/०८/२०१८-१९ | म.न.पा.चे प्रभाग क्र.३० मधील आई उदयान व सितांगण उदयानाचे नुतणीकरणाचे कामकाज करणेबाबत | ३०/०८/२०१८ | क्र.उदयान/६/कावि/९३३/२०१८ | ०७/०९/२०१८ | २३,२२,८२०/- | २३.१३ % कमी | १७,८५,५५२/- |
| ५. | मे.अथर्व स्वयंरोजगार औघोगिक सेवा सह.मर्या. | ०१/१०/२०१८-१९ | म.न.पा.चे. क व ई क्षेत्रिय कार्यालयातील विविध उदयानांचे नुतणीकरणाचे कामकाज करणेबाबत. | ०३/०९/२०१८ | क्र.उदयान/६/कावि/९२८/२०१८ | ०७/०९/२०१८ | ६,६३,७०२/- | १०.१० % कमी | ५,९६,६६८/- |
| ६. | मे.महालक्ष्मी ग्रीनहाऊस | ०७/२०१६-१७ | म.न.पा.चे. तळवडे पॉलीहाऊस प्रकल्पासाठी पॉलीथिन पेपर व शेडनेट पुरविणे व बसविणेबाबत. | २०/०८/२०१८ | क्र.उदयान/६/कावि/७८०/२०१८ | २५/०७/२०१८ | ८,११,७५६/- | ०.१० % कमी | ८,१०,[illegible]/- |

[illegible]

अति.आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८.

**(मा. महिला व बालकल्याण समिती सभा ठराव क्रमांक १० दिनांक ०४/०९/२०१८ लगतचे "प्रपत्र – अ" ) विषय क्र. २५ चे लगत**

| अ. क्र | प्रशिक्षण विषयाचे नाव | कार्यक्रम कालावधी दररोज २ तास | | प्रति लाभार्थी एकुण प्रशिक्षण शुल्क ( सर्व करांसहित ) र.रु. |
|---|---|---|---|---|
| | | दिवस | तास | |
| १ | २ | ३ | | ४ |
| १ | स्पोकन इंग्लिश, संभाषण कौशल्य व व्यक्तिमत्व विकास प्रशिक्षण. | ९० दिवस | १८० तास | ६,३७२/- |
| २ | फिटनेस ट्रेनर व संतुलित आहार विषयक प्रशिक्षण. | ४५ दिवस | ९० तास | ३,१८६/- |
| ३ | रुग्णसेविका व रुग्ण आहार संतुलन प्रशिक्षण. | ४५ दिवस | ९० तास | ३,७१७/- |
| ४ | सॅनिटरी नॅपकीन प्रशिक्षण. | १० दिवस | २० तास | ७०८/- |
| ५ | गांडुळखत निर्मिती प्रशिक्षण. | २० दिवस | ४० तास | १,४१६/- |
| ६ | झुम्बा प्रशिक्षक प्रशिक्षण. | २० दिवस | ४० तास | १,४१६/- |
| ७ | मेहंदी व रांगोळी प्रशिक्षण. | ४५ दिवस | ९० तास | ३,१८६/- |
| ८ | हस्तनिर्मितसह विविध प्रकारच्या पेपरपासुन विविध वस्तु / साहित्य तयार करणे व कापडी पिशव्या तयार करणेचे प्रशिक्षण. | ६० दिवस | १२० तास | ४,२४८/- |
| ९ | पारंपारिक दागिने तयार करणेचे प्रशिक्षण. | ४५ दिवस | ९० तास | ३,७१७/- |
| १० | फॅशन डिझायनिंग प्रशिक्षण. | ९० दिवस | १८० तास | ६,३७२/- |
| ११ | इन्स्टंट पीठे व ग्रेव्ही पावडर तयार करणेचे प्रशिक्षण. | ४५ दिवस | ९० तास | ३,१८६/- |
| १२ | फुड प्रोसेसींग व फॅन्सी कुकरी प्रशिक्षण. | ७० दिवस | १४० तास | ४,९५६/- |
| १३ | फायबर ग्लास ॲडव्हान्स प्रशिक्षण. | ४५ दिवस | ९० तास | ३,१८६/- |
| १४ | आयुर्वेदिक औषधे व कॉस्मेटीक उत्पादने प्रशिक्षण. | ४५ दिवस | ९० तास | ३,१८६/- |

सही/-
**( ममता विनायक गायकवाड )**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.